स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

D:\२०२४-२५\भांडार\लेटर.docx.१३७

जा.क्र. प्रशा/भां.छ.ले.सा.वि./वा.यं.दे.दु.ठे.द./प्र.प/३३२६/२०२४-२५ दि. :- २७/१२/२०२४.

**प्रसिध्दी पत्रक**

विषय :- वातानुकुलन यंत्रणेचे वार्षिक देखभाल दुरूस्तीकामी दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून सर्व पुरवठाधारक / ठेकेदार यांना कळविणेत येते की, मुख्य कार्यालय व इतर विभागामध्ये १ टन क्षमतेचे १४ वातानुकुलन यंत्र (मा. सभापती दालन - ३, मा. उपसभापती दालन - ३, मा. संचालक कक्ष - १, मा. कार्यकारी अभियंता - १, मा. उपकार्यकारी अभियंता - १, स्थापत्य विभाग - २, पेट्रोल पंप कार्यालय - १, विधी विभाग - १, भरारी पथक - १) तसेच १.५ टन क्षमतेचे १६ वातानुकुलन यंत्र (सभागृह - ३, अतिथीगृह - २, मा. सचिव साहेब दालन - २, मा. सहसचिव दालन - १, मा. उपसचिव दालन - २, मा. सहाय्यक सचिव दालन - ३, संगणक कक्ष - १, फुलांचा बाजार विभाग - १, सी.सी.टी.व्ही. कक्ष - २, गुळ भूसार वि.प्र. दालन - १, भांडार विभाग - १) याप्रमाणे एकुण ३० नग वातानुकुलन यंत्र असून त्यांची एकुण क्षमता ३८ टन इतकी आहे. सदर ३० ए.सी. मशीनचा नॉनकॉम्प्रेसिव वार्षिक देखभाल दुरूस्तीचा ठेका देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

सदर देखभाल दुरूस्तीचे काम करणेकामी उपरोक्त मशीनची समक्ष पाहणी करून खालील नियम व अटींचे अधीन राहून आपले कमीत कमी दराचे दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये दि ३/०१/२०२५ अखेर दु. १.०० वाजेपावेतो संस्थेच्या भांडार शाखेत पोहोच करावे.

**नियम व अटी :-**

१. दरपत्रकामध्ये फर्मचा जी.एस.टी. क्रमांक, पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमूद करावा.
२. दरपत्रकामध्ये मूळ दर अधिक जी.एस.टी. दर याप्रमाणे दर नमूद करावेत तसेच दरपत्रकामध्ये कामाचा एच.एस.एन. कोड नमूद करावा.
३. बाजार समितीचे कार्यालयातून देखभाल दुरूस्तीसाठी बोलविलेनंतर तात्काळ हजर राहणे बंधनकारक असेल.
४. सदर ठेका हा नॉन क्रॉम्प्रेसिव असल्याने दुरूस्ती कामासाठी आवश्यक असलेले साहित्य बाजार समिती पुरवठा करेल. बाजार समितीने साहित्य पुरवठा केल्यानंतर ते विनामोबदला बसवून देणे ठेकेदारावर बंधनकारक असेल. तसेच दुरूस्ती कामाच्या आवश्यकतेनुसार आवश्यक असलेले साहित्य प्रचलित घाऊक बाजारभावाने बाजार समितीस पुरवठा करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.
५. कामकाजामध्ये हलगर्जीपणा, त्रुटी आढळल्यास कोणतेही कारण न देता सदर ठेका रद्द करणेत येईल.
६. मुदतीनंतर दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
७. दरपत्रक उघडतेवेळी संबंधित पुरवठाधारक / ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधीने बाजार समितीचे मुख्य कार्यालयात वेळेत हजर रहावे.
८. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समितीने राखून ठेवला आहे.
९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ०३/०१/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात मा. सहसचिव यांचे दालनात दरपत्रके सीलबंद असलेची खात्री करून उघडणेत येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.
१०. नियम व अटी मान्य असणाऱ्या ठेकेदारांनीच दरपत्रके सादर करावीत.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे.